स्थायी समिती
दाखल विषय – दि. ८/१२/२०२०

विषय क्रमांक :– ७७४ त्वर्य

मा.सौ.मानसी देशपांडे, मा.सौ.वर्षा तापकीर, मा.दिपक पोटे, मा.प्रकाश ढोरे, मा.सौ.सुनिता गलांडे, मा.कु.हिमाली कांबळे, मा.सौ.उज्ज्वला जंगले व मा.महेंद्र पठारे यांचे दि.८/१२/२०२० चे पत्र.

विषय :- सन २०२०-२१ या वर्षात (मोबाईल टॉवर वगळून) मिळकतकरावरील शास्तीवर / व्याजावर अभय योजनेस मुदतवाढ देणेबाबत

निवासी व बिगर निवासी थकीत मिळकतकर वसुलीसाठी सन २०२०–२१ या आर्थिक वर्षात संदर्भ क्र. ७ अन्वये अभय योजना राबविणेसाठी मा.स्थायी समितीमध्ये ठराव पारित करण्यात आला.

त्यास मा.महापालिका आयुक्त यांनी प्रशासकीय मान्यता दिलेली असून दि. २/१०/२०२० ते ३०/११/२०२० या कालावधीसाठी मिळकत कर वसुलीसाठी २% शास्ती/दंडावर ८०% सवलत देण्याची अभय योजना रक्कम रु. १ ते ५० लाखापर्यंतच्या मिळकतींना लागू करण्यात आलेली होती. सदर अभय योजनेमध्ये सुमारे १,१४,००० इतक्या मिळकतधारकांनी सुमारे रक्कम रु. ३५५ कोटी इतका मिळकतकर पुणे मनपाकडे जमा केलेला असून सुमारे रक्कम रु. १८१ कोटी इतकी सवलत देण्यात आलेली आहे.

उपरोक्त कालावधीत अभय योजनेमध्ये दसरा व दिवाळी असे मोठे सण असल्यामुळे अनेक नागरिकांना थकबाकीचा भरणा करुन अभय योजनेचा लाभ घेता आला नाही. त्यामुळे अनेक नागरिक तसेच लोकप्रतिनिधी यांचेकडून सदर अभय योजनेचा कालावधी वाढविणेबाबत सतत मागणी करण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधानचे नियम ५१ चे अवलोकन होऊन सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये सदर अभय योजनेस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१) सदरील अभय योजना मोबाईल टॉवर वगळून सर्व मिळकतींना लागू राहील,

२) ज्या मिळकतीवर थकबाकी आहे, अशा मिळकतधारकांनी खालील कालावधीत थकबाकीसह संपूर्ण रक्कम एकरकमी भरल्यास भरणा दिनांकापर्यंत आकारण्यात आलेल्या एकूण २% शास्ती रक्कमेच्या खालील प्रमाणे शास्ती रक्कमेत माफी देणेस,

| अ.क्र. | कालावधी | दि. ३०/११/२०२० अखेर मिळकतीवर मागणी व शास्ती अशी एकत्रित ५० लक्ष पेक्षा कमी थकबाकी असलेल्या रक्कमेच्या २% शास्ती रक्कमेवर खालील प्रमाणे माफी देण्यास |
|---|---|---|
| १ | १०/१२/२०२० ते ३१/१२/२०२० | ७५% |
| २ | ०१/१/२०२१ ते २६/०१/२०२१ | ७०% |

३) सदरील अभय योजनेबाबत जनजागृती होणेकामी एसएमएस / इमेल पाठवणे, रेडिओ, सिनेमागृहे इ. मार्फत जाहीरात देणे, तसेच हॅण्डबील्स, जाहीर प्रकटन, प्रेस नोट देणे, फ्लेक्स बोर्डस, बॅनर्स इ. द्वारे आवश्यकतेनुसार प्रसिद्धी देणे व याकामी येणारा खर्चाची बीले सन 2020-21 चे अर्थसंकल्पातील छ. कर आकारणी व कर संकलन कार्यालय, 3 संकीर्ण चे अर्थशिर्षकावर खर्ची टाकण्यास,

४) मिळकतधारकाने अभय योजना कालावधीत दिलेला धनादेश अनादारीत (बाउन्स) झाल्यास मिळकतधारक अभय योजनेच्या ज्या कालावधीत विहित मार्गाने (रोख, डीडी, ऑनलाईन पद्धतीने) संपूर्ण थकबाकी रक्कम अदा करील त्या कालावधीस लागू असणाऱ्या सवलतीनुसार अभय योजनेचा लाभ देण्यास,

५) कोणत्याही कारणास्तव अभय योजनेच्या कालावधीनंतर येणाऱ्या मिळकतधारकांना अभय योजनेचा लाभ देता येणार नाही,

विषय क्रमांक :– ७७५ त्वर्य

**पुणे शहरामध्ये “ Electric Bike Renting Project ” संकल्पना राबविण्यासाठी VTRO Motors Pvt Ltd, व EMatrix Mile च्या प्रस्तावाबाबत** मा.अमोल बालवडकर, अध्यक्ष,शहर सुधारणा समिती यांचे दि.२६/६/२०२० चे पत्रावर झालेला शहर सुधारणा समिती ठराव क्र. २९ दि.२६/६/२०२० वर झालेला मा. स्थायी समिती ठराव क्र. ३१५ दि.१४/७/२०२० ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/पथ/४६९ दि. ८/१२/२०२० ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

विषय क्रमांक :– ७७६ त्वर्य

पुणे म.न.पा. अतिक्रमण/अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग, बांधकाम विकास विभागाकडील अनधिकृत बांधकाम कारवाईकरिता व अतिक्रमण निर्मुलन कारवाईसाठी अकुशल मजूर पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार सुरेश एम.पंड्या यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,७४,४०९=१२ पेक्षा २.२६% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.०१,०२,००,६२८=७१ पर्यंत काम करुन घेण्यासाठी अधिक टेंडर अटी शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ अदा करणेस, तसेच सदर काम अत्यावश्यक असल्याने या कामास प्राईस बीडच्या दिनांकापासून काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/अतिक्रमण/४५७ दि.७/१२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ७७७ त्वर्य

रक्कम रू. ७० कोटी १ वर्ष, ३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/४५८ दि. ७/१२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ७७८ त्वर्य

रक्कम रू. ७० कोटी १ वर्ष, ३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/४५९ दि. ७/१२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ७७९ त्वर्य

रक्कम रू. ७० कोटी १ वर्ष, ३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/४६० दि. ७/१२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ७८० त्वर्य

रक्कम रू. ३० कोटी १ वर्ष, ३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/४६१ दि. ७/१२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ७८१ त्वर्य

रक्कम रू. ३० कोटी १ वर्ष, ३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/४६२ दि. ७/१२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ७८२ त्वर्य

रक्कम रू. ३० कोटी १ वर्ष, ३६५ दिवस, ३६६ दिवस किंवा त्यापेक्षा कमी मुदतीसाठी गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/मुले/४६३ दि. ७/१२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ७८३ त्वर्य

येरवडा हॉट मिक्स प्लान्ट/बॅच मिक्स प्लॅन्टमार्फत रस्ते तयार करणे देखरेख करणे व तदनुषंगिक कामे करणे या कामाअंतर्गत कुशल व अकुशल (पेव्हर ड्रायव्हर, रोलर ड्रायव्हर, बिगारी इतर सेवक वर्ग) कामगार वर्ग पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.हेमंत व्ही.शहा यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९९,०१,११८=२० पेक्षा १४.९०४% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,१३,७६,७८०=८५ पर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करार करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/पथ/४६८ दि.८/१२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ७८४ त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या परिमंडळ क्र. १ च्या कार्यक्षेत्रातील विविध सांस्कृतिक भवनाची १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० या कालावधीमध्ये ऑपरेटिंग कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.श्री अथर्वरथी इलेक्ट्रीकल्स् यांचे एकच टेंडर आले (पुर्वगणनपत्रक र.रु. ३३,६०,४८५=६५ पेक्षा १०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.३६,९६,५३४=२२ पर्यंत काम करून घेणेस व त्यानुसार त्यांचेशी करारनामा करणे व केलेल्या कामाचे बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ई) यांचे जा.क्र. मआ/विदयुत/४७० दि.८/१२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ७८५ त्वर्य

पुणे मनपाच्या परिमंडळ क्र. ५ च्या अंतर्गत असलेल्या विविध सांस्कृतिक भवने, कलादालने, लाईट अॅण्ड साउंड शो व ४ डी थिएटर यांची वार्षिक ऑपरेटिंगची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.श्री अथर्वरथी इलेक्ट्रीकल्स् यांचे एकच टेंडर आले (पुर्वगणनपत्रक र.रु. ५२,३३,३१०=१६ पेक्षा १०% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.५७,५६,६४१=१८ पर्यंत काम करून घेणेस व या कामाची मुदत ब पाकीट उघडलेच्या दिनांकापासून म्हणजेच दि. ८/८/२०१९ पासून ग्राहय धरणेस व केलेल्या कामाचे बिल अदा करणेस व त्यानुसार त्यांचेशी करारनामा करणेस पश्चात मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(इ) यांचे जा.क्र. मआ/विदयुत/४७१ दि.८/१२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ७८६ त्वर्य

नगरसचिव कार्यालयाकडील सेवक श्रीमती उर्मिला रमाकांत यादव, हुद्दा शिपाई यांनी मनपा सेवेतुन ऐच्छिक सेवानिवृत्ती मिळावी म्हणून दिनांक २५/११/२०२० रोजी विनंती अर्ज केलेला असून सदर सेवकाचा ऐच्छिक सेवानिवृत्तीची विनंती मनपा सेवाविनियम ६६(जे) मधील २० वर्षे सेवा पुर्णतेची / वयाबाबतची, तरतुद विचारात घेऊन श्रीमती उर्मिला रमाकांत यादव, हुद्दा शिपाई यांना त्यांचे स्वेच्छेनुसार व त्यांचे मागणीनुसार दिनांक २८/२/२०२१ रोजी कार्यालयीन वेळेनंतर मनपा सेवेतुन (ऐच्छक सेवानिवृत्ती) सेवामुक्त करण्यास व सेवानिवृत्तीमुळे नियमाप्रमाणे पेन्शन,ग्रॅच्यूएटी इ.मिळणारे सर्व फायदे त्यांना अदा करणेस तसेच त्यांचेकडुन मनपाची येणे बाकी असल्यास वा निघाल्यास ती विनाविलंब वसुल करण्यास मान्यता देण्याबाबत मा.प्रभारी नगरसचिव यांचे जा.क्र. २५८३ दि.८/१२/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– ७८७ त्वर्य

मा.सौ.सरस्वती शेंडगे, उपमहापौर यांचे दि.७/१२/२०२० चे पत्र.

अॅड्.अवनी ओंकार जोशी यांनी सन २०१० साली एल.एल.बी. पदवी पुणे विद्यापीठातून घेतली आहे.

त्यांना दिवाणी व फौजदारी विषयांचे चांगले ज्ञान असून त्या गेली १० वर्षे शिवाजीनगर न्यायालय व मुंबई उच्च न्यायालय येथे काम करीत आहेत.

अॅड्.अवनी ओंकार जोशी यांना पुणे महानगरपालिकेच्या विधी विभागाच्या पॅनेलवर वकील म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– ७८८ त्वर्य

मा.सुनिल कांबळे, आमदार व मा.महेंद्र पठारे यांचे दि.३/१२/२०२० चे पत्र.

अमित नाईक, डिझाईन फाउंड्री हे गेली १५ वर्षापासून आर्किटेक्चर डिझाईनिंग, लँडस्केप डिझाईनिंग, इंटीरीअर डिझाईनिंग चा व्यवसायाच्या माध्यमातून आत्तापर्यंत बरीच कामे केली आहेत.

तरी अमित नाईक, डिझाईन फाउंड्री यांची चंदननगर येथील पीटटी कोर्टयार्ड येथे पुणे महानगरपालिकेच्या डिझायनर/आर्किटेक्ट डिझायनर पॅनेलवर नेमणूक करण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :– ७८९ त्वर्य

मा.प्रमोद भानगिरे यांचे दि.८/१२/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र. २६, महंमदवाडी–कौसरबाग मध्ये महंमदवाडी येथील सर्व्हे नं. २६/२ येथे शालेय रिझर्व्हेशन असलेल्या एक एकर जागा असून त्यावर शाळेचे आरक्षण आहे. ही एक एकर जागा इतहाद एज्युकेशन सोसायटी सीराय २ इस्टेट दुसरा मजजा, कोंढवा रोड, पुणे यांना ३० वर्षे भाडेकराराने देण्यात यावी.

विषय क्रमांक :– ७९० त्वर्य

मा.प्रमोद भानगिरे यांचे दि.८/१२/२०२० चे पत्र.

प्रभाग क्र. २६, महंमदवाडी–कौसरबाग मध्ये महंमदवाडी येथील सर्व्हे नं. ३९ हिस्सा नं. १३ब+१४/१, १३ब+१४/२, १३ब/+१४/३, १३ब/+१४/४ एकूण क्षेत्र ३१ आर पैकी २५९४ चौ.मी. क्षेत्राचा ताबा सुफ्फा एज्युकेशन सोसायटी, ६६६/६९ गुरुवार पेठ या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेला ३० वर्षे भाडेकराराने देण्यात यावी.

विषय क्रमांक :– ७९१ त्वर्य
मा.अजय खेडेकर यांचे दि.७/१२/२०२० चे पत्र.

माझ्या प्रभाग क्र. १८ क मध्ये डॉ.कोटणीस दवाखाना (गाडीखाना) येथे सध्या रिक्त असणाऱ्या खोल्यांमध्ये ५० बेडचे डायलेसिस सेंटर सुरु करण्यात यावे.

शिवाजी दौंडकर
प्रभारी नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.